# वनसंरक्षक (प्रादेशिक) यवतमाळ यांचे कार्यालय

वनभवन चर्च रोड यवतमाळ ४४५ ००१

☎०७२३२-२४२८९४ ०७२३२-२४२१९४

conytlyvt@gmail.com/ccftyavatmal@m ahaforest.gov.in


आदेश क्रमांक - ९५८                                   यवतमाळ ४४५ ००१ दिनांक ७/२ /२०२५

**विषय - वनरक्षक संवर्गातुन वनपाल संवर्गामध्ये पदोन्नती व पदस्थापना ----**

वनरक्षक पदावरुन वनपाल पदावर खुल्या प्रवर्गात तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समीतीची बैठक दिनांक ०७/०२/२०२५ रोजी संपन्न झालेली आहे. विभागीय पदोन्नती समितीच्या सभेमध्ये पदोन्नतीस पात्र ठरविण्यात आलेल्या वनरक्षकांना दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीस अनुसरुन मर्यादीत कोटयातील वनपाल पदावर खुल्या प्रवर्गात तात्पुरते पदोन्नतीचे आदेश खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे. वनरक्षक या संवर्गातुन वनपाल संवर्गामध्ये सुधारित वेतन संरचनेनुसार वेतन स्तर (एस-९:-२६४००-८३६००) या वेतनमानात वनपाल या पदावर खाली नमुद केलेल्या अटीवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

१. संबंधितांना देण्यात येणारी पदोन्नती ही शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०१७/प्र.क्र.३१२/A १६ ब, दिनांक २९/१२/२०१७ अन्वये नमुद सुचनांचे अधिन राहुन देण्यात येत आहे. तसेच सदर पदोन्नती वनपाल संवर्गातील काही दावे / याचिका दाखल केल्या/झाल्या असल्यास सदर प्रलंबित याचिकांच्या अंतिम निर्णयाचे अधिन राहतील.
२. वनपाल संवर्गाच्या सर्व सेवा शर्ती संबंधितांना बंधनकारक राहतील.
३. मागासवर्गीय पदोन्नत कर्मचा-यांच्या बाबतीत जातीच्या दाव्यासंबंधी भविष्यात वाद निर्माण झाल्यास त्यासाठी संबंधित कर्मचारी जबाबदार राहील व चौकशीत जर संबंधिताचा जातीचा दावा खोटा असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिता विरुद्ध शिस्त भंगाची कार्यवाही करण्यात येईल.
४. सदर कर्मचारी यांची पदोन्नती ही वनरक्षक संवर्गाच्या अंतिम जेष्ठतेच्या व त्यामध्ये होणा-या बदलांच्या अधीन राहील व तसेच सदर पदोन्नती ही मर्यादीत कोटयातील वनपाल पदावरील असल्याने त्यांना सदर पदोन्नतीच्या दिनांकापासुन वनपाल पदावरील जेष्ठतेचा हक्क मागता येणार नाही.
५. सदर कर्मचारी यांना देण्यात आलेली तात्पुरती पदोन्नती कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखुन ठेवीत आहे.
६. सदर कर्मचारी यांची पदोन्नती ५०/५५ च्या वर्षाच्या पुर्नविलोकनाच्या निर्णयाच्या अधिन राहील.
७. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही १०१५/प्र.क्र-१/६५/१२, दिनांक ८/६/१९९५ अन्वये कालबध्द पदोन्नती व शासन निर्णय क्रमांक वेतन -११९९/प्र.क्र-२/९२/सेवा-३, दिनांक २०/७/२००१ अन्वये आश्वासीत प्रगती योजनेच्या लाभ घेतलेला आहे, अशा कर्मचा-यांनी पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला कालबध्द पदोन्नतीचा किंवा आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ काढुन घेण्यात येईल.
८. या आदेशाव्दारे पदोन्नत करण्यात आलेले कर्मचारी ज्या तारखेला पदस्थापना दिलेल्या ठिकाणी रुजु होतील त्या तारखेला त्यांची पदोन्नतीचे पदावर वेतन निश्चीती करण्यात येईल. तथापी ज्या कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत किंवा आश्वासीत प्रगती योजनेअंतर्गत वनपाल या संवर्गाची वरिष्ठ वेतन श्रेणी आधीच लागु करण्यात आली असेल, त्यांची पुन्हा वेतन निश्चीती करण्याची आवश्यक्ता नाही.
९. सदर आदेश प्राप्त होण्यापुर्वी ज्या कर्मचा-यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असेल, अथवा त्यांनी निलंबनाखाली ठेवण्यात आले असेल तर सदर कर्मचा-यांना पदोन्नतीचे आदेश लागु राहणार नाही.

१०. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक ०२ जुन २०१४ अन्वये पदोन्नती करिता मत्ता व दायित्व याची वार्षिक विवरणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन दिनांक २८/५/२०१८ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी /वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत ) (सुधारणा) नियम,२०१८ नुसार संगणक हाताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक ठरविले आहे. ज्या शासन सेवकाने वयाची ५० वर्ष पुर्ण केली असेल त्यांना प्रमाणपत्र सादर करण्यापासुन सुट मिळेल अशी तरतुद आहे. त्याचप्रमाणे संबधीत कार्यालय प्रमुखाने सदर विवरणपत्रे/संगणक प्रमाणपत्र अथवा सुट दिल्याबाबत खात्री करावी.

११. संबधीत वनरक्षकास वर नमुद अटी व शर्तीचे अधिन खुल्या प्रवर्गात पदोन्नती नंतरची वनपालांची पदस्थापना खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र | जेष्ठता क्रमांक | वनरक्षकाचे नांव (सर्व श्री) | कार्यरत विभाग | वनरक्षक पदावर नियुक्ती चा प्रवर्ग | वनपाल पदावर पदोन्नतीचा प्रवर्ग | वनपाल पदावरील पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६६४ | नरेंद्र वामन मस्के | पांढरकवडा वनविभाग | भ.ज.क | खुला | वनपाल वि.से.उमरखेड पुसद वनविभाग | रिक्त पदावर |
| २ | ७११ | दिनेश विठ्ठल राठोड | यवतमाळ वनविभाग | खुला (दिव्यांग) | खुला | क्षेत्र सहा.दराटी, वपअ कोरटा वन्यजीव विभाग पांढरकवडा | रिक्त पदावर |
| ३ | ७१२ | विश्वनाथ खंडुजी धुमाळे | पुसद वनविभाग | अनु. जमाती (दिव्यांग) | खुला | क्षेत्र सहा.वणी, वपअ वणी पांढरकवडा वनविभाग | दि.२८/०२/२०२५ रोजी से.नि.मुळे रिक्त होणा-या पदावर |
| ४ | ७१३ | कु.सुरेखा मनिराम कुंभेकर | पांढरकवडा वनविभाग | अनु. जमाती | खुला | क्षेत्र सहा.पारवा, वपअ पारवा पांढरकवडा वनविभाग | रिक्त पदावर |
| ५ | ७१४ | कु.अर्चना देवराव कुडमेथे | पांढरकवडा वनविभाग | अनु. जमाती | खुला | वनपाल वि.से पांढरकवडा, वपअ पांढरकवडा पांढरकवडा वनविभाग | रिक्त पदावर |
| ६ | ७१५ | मंगलप्रसाद पुंडलीक बेले | पुसद वनविभाग | अनु. जमाती | खुला | वनपाल सा.वनी.परिक्षेत्र वाशिम सामाजिक वनीकरण विभाग वाशिम | रिक्त पदावर |
| ७ | ७१९ | सचिन राघोबाजी ताजणे | यवतमाळ वनविभाग | अनु.जाती( दिव्यांग) | खुला | वनपाल वि.से.दिग्रस,वपअ दिग्रस पुसद वनविभाग | रिक्त पदावर |
| ८ | ७२१ | अरुण प्रल्हाद थुल | यवतमाळ वनविभाग | अनु.जाती (दिव्यांग) | खुला | क्षेत्र सहा.वालतुर, वपअ कोरटा वन्यजीव विभाग पांढरवडा | रिक्त पदावर |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ७२२ | सचिन भाऊराव मोरे | यवतमाळ वनविभाग | खुला | खुला | क्षेत्र सहा.सोनखास,वपअ नेर यवतमाळ वनविभाग | रिक्त पदावर |
| १० | ७२३ | गुणवंत रामकृष्ण दर्वे | पांढरकवडा वनविभाग | खुला | खुला | क्षेत्र सहा.रुई,वपअ हिवरी यवतमाळ वनविभाग | रिक्त पदावर |
| ११ | ७२४ | अरविंद अमरसिंग राठोड | पुसद वनविभाग | खुला | खुला | वनपाल वि.से.पुसद,वपअ पुसद पुसद वनविभाग | रिक्त पदावर |
| १२ | ७२५ | अमित बबनराव मोहोड | यवतमाळ वनविभाग | खुला | खुला | क्षेत्र सहा.बोरगांव, वपअ उत्तर आर्णि , यवतमाळ वनविभाग | रिक्त पदावर |

१२. उपरोक्त सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे संमतीपत्र प्राप्त करुन संबधिताचे सेवा पुस्तीकेसोबत जतन करावे, पुर्तता अहवाल कार्यालयात सादर करावा.

१३. सदर आदेश तात्काळ अमलात येतील. संबंधित नियंत्रक अधिका-यांनी उक्त शासकीय सेवकांना त्यांचे पदोन्नतीचे जागेवर रुजु होण्यासाठी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. पदोन्नती नंतर संबंधित कर्मचारी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होत नसेल तर अशा कर्मचा-यांविरुद्ध सक्षम प्राधिकारी यांनी नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करावी. अनु.क्रमांक ३ वरील श्री.विश्वनाथ खंडुजी धुमाळे, वनरक्षक यांना पदोन्नतीचे पदावर रुजु होण्याकरिता दिनांक २८/०२/२०२५ रोजी कार्यमुक्त करावे.

१४. पदोन्नतीनें पदस्थापना ही संपुर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही कर्मचा-याने पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे बाबत प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम, १९८१ मधील नियम २३ चा भंग केला म्हणुन ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील.

( एम.आदर्श रेड्डी )
वनसंरक्षक (प्रादेशिक)
यवतमाळ वनवृत्त

क्रमांक:अ/वसं(य)/कक्ष-८/आस्था/३०४० /२०२५
यवतमाळ ४४५ ००१ दिनांक- ०६/ ०२ /२०२५

प्रति,
वरील प्रमाणे वनरक्षक (सर्व)
मार्फत:- उपवनसंरक्षक (सर्व)/ विभागीय वनअधिकारी (सर्व)

प्रतिलीपी :- मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( प्रशासन दुय्यम संवर्ग) म.रा.नागपुर यांना माहीती करिता सविनय सादर.

प्रतिलीपी:- वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांना माहिती करिता सस्नेह अग्रेषित.

प्रतिलीपी:- वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण,अमरावती यांना माहिती करिता सस्नेह अग्रेषित.

प्रतिलीपी :- उपवनसंरक्षक यवतमाळ (सर्व)/ विभागीय वनअधिकारी (सर्व)/ यांना वरील प्रमाणे माहिती तथा आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित. वनरक्षक संवर्गातुन वनपाल संवर्गात पदोन्नत झालेल्या कर्मचारी यांना तात्काळ कार्यमुक्त करावे/ रुजु करुन घ्यावे व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयात सादर करावा.

प्रतिलीपी :-आदेश फाईल.